वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (प), जि-पालघर, पिन नं. ४०१३०३
दुरध्वनी - ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५० - २५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. १६५७

विभाग :- वृक्षप्राधिकरण व उद्यान
दिनांक :- २६/११/२०२५

---

**प्रस्तावाचा विषय :-** **वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) मधील आरक्षण क्र. ३६१ मध्ये दिव्यांग पार्क / मैदान विकसीत करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** उपरोक्त विषयांन्वये सादर करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग बांधवांसाठी खेळ, शारीरिक तंदुरूस्ती तसेच सामाजिक एकात्मता वाढविण्यास उपयुक्त असे स्वतंत्र दिव्यांग मैदानाची आवश्यकता प्रकर्षाने जाणवत आहे. सध्या शहर परिसरात अशा प्रकारची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे दिव्यांग व्यक्तींना खेळाच्या किंवा व्यायामाच्या क्रियामध्ये सहभागी होणे कठीण जात आहे. तसेच शहरातील इतर उद्यान मध्ये नागरीकाची मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने अशा उद्यानात दिव्यांगाना शारीरिक कसरत करणे शक्य होत नाही व शहरातील दिव्यांग मैदानाचा व खेळणी, जिम साहित्य वापर करू शकत नाही.

यासाठी सर्व बाबींचा विचार करून शहरात खालीलप्रमाणे सुविधा असलेले सुसज्ज दिव्यांग मैदान निर्माण करणे आवश्यक आहे. याकरीता, नवीन दिव्यांग पार्क / मैदान विकसित करण्यासाठी खालील सुविधा प्रस्तावित आहेत.

१. व्हीलचेअर-फ्रेन्डली पथवे (Ramps & Pathways)
२. टॅक्टाइल पाथ (दृष्टीहीनांसाठी स्पर्शाद्वारे मार्गदर्शन करणारे पट्टे)
३. सुलभ शौचालय व्यवस्था (Accessible Toilets)
४. विशेष बसण्याची सोय व सावली करीता शेड.
५. दिव्यांग अनुकूल खेळाचे साहित्य (Accessible Play Equipment)
६. श्रवण दिव्यांगांसाठी ध्वनी/दृश्य सूचना बोर्ड.
७. योग व फिजिओथेरपीसाठी खुली जागा.
८. सीसीटीव्ही व सुरक्षा व्यवस्था.
९. पुरेशी प्रकाशयोजना व हरित क्षेत्र.

वरील सर्व सुविधांमुळे दिव्यांग नागरिकांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासास मदत होईल. तसेच त्यांच्या कुटुंबियांनाही सुरक्षित वातावरणात वेळ घालवता येईल.

तरी, नवीन दिव्यांग पार्क / मैदान विकसित करण्यासाठी आवश्यक बाबींनुसार तांत्रिक सल्लागारामार्फत अंदाजपत्रक बनविण्यात आलेले आहे. सदर अदांजपत्रकानुसार **रक्कम रू. ६,२४,४२,३०९/- (अक्षरी रू. सहा कोटी चोवीस लक्ष बेचाळीस हजार तिनशे नऊ रूपये मात्र/-)** रक्कम खर्च अपेक्षित आहे.

सदर उद्यान विकसित करणे कामाच्या अंदाजपत्रकास मा. शहर अभियंता याची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष- दिव्यांग व विशेष व्यक्तींकरीता कल्याणकारी योजनेंतर्गत भांडवली कामे लेखा सांकेतांक ७२४-४१३० या लेखाशिर्षकाअंतर्गत पुर्नविनियोजनाच्या अधिन राहून सदरचा होणारा खर्च भागविण्यात येईल.

तरी, सदर वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) मधील आरक्षण क्र. ३६१ मध्ये दिव्यांग पार्क / मैदान विकसीत करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस मंजूरीस्तव सादर.

ठराव निर्णय :-

१) वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) मधील आरक्षण क्र. ३६१ मध्ये दिव्यांग पार्क / मैदान विकसीत करणेकामी होणारा अपेक्षित खर्च रक्कम रू. ६,२४,४२,३०९/- (अक्षरी रू. सहा कोटी चोवीस लक्ष बेचाळीस हजार तिनशे नऊ रूपये मात्र/-) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

२) सदरचा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष- दिव्यांग व विशेष व्यक्तींकरीता कल्याणकारी योजनेंतर्गत भांडवली कामे लेखा सांकेतांक ७२४-४१३० या लेखाशिर्षकाअंतर्गत पुनर्विनियोजनाच्या अधिन राहून सदरचा होणारा खर्च या रक्कमेतून भागविता येईल.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका